पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७५५ दिनांक - २३/१०/२०२३**

पर्वती पोलीस स्टेशन,पुणे शहर

**ऋषिकेश दिपक जगताप (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०५ साथीदार यांचे विरूध्द मकोका कारवाई**

दि.०५/०९/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे मित्रांसोबत बिल्डींग चौक,दत्तवाडी पुणे येथे गप्पा मारत थांबले असताना,दुचाकीवरून आलेल्या इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ केली. त्याबाबत फिर्यादी यांनी त्यांना विचारणा करता इसम नामे ऋषिकेश दिपक जगताप व त्याचे इतर साथीदार यांनी त्यांचेकडील तलवारीने फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचेवर वार करून त्यांना गंभीर जखमी करून,सदर परिसरातील नागरीकांना धमकी देवुन,त्या भागात दहशत निर्माण केली होती. त्याबाबत **पर्वती पोलीस स्टेशन गु.रं.नं.२६४/२०२३,भा.दं.वि.क. ३०७,३२६,१४३, १४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६, आर्म ॲक्ट ४(२५),म.पो.अधि.कलम ३७(१)सह १३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास करीत असताना,सदरचा गुन्हा हा आरोपी नामे **१)ऋषिकेश दिपक जगताप, वय २५ वर्ष,रा.स.नं.१३०,दांडेकर पुल,पुणे (टोळी प्रमुख) २)संकेत ऊर्फ बल्ली राहूल वाघमारे,वय २० वर्षे,रा. दांडेकर पुल, सिंहगड रोड,पुणे ३)निखिल बिभिषण लगाडे,वय २८ वर्ष, रा.दांडेकर पुल,पुणे ४)गणेश गौतम वाघमारे,वय १९,रा.दांडेकर पुल,पुणे ५) आदिनाथ सोपान साठे,वय २९ वर्षे,रा.जनता वसाहत,पर्वती पायथा पुणे (टोळी सदस्य) ६)राम मोहन बनसोडे,वय २३,रा.दांडेकर पुल,दत्तवाडी,पुणे** यांनी केल्याचे निष्पन्न झाल्याने यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपीं ऋषिकेश दिपक जगताप,वय २५ वर्ष,रा.स.नं.१३०,दांडेकर पुल,पुणे (टोळी प्रमुख) याने संघटित गुन्हेगारी टोळी तयारी केली असुन,सदर टोळीने बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी इतर फायदा मिळविण्याचे उद्देशाने संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देवून किंवा धाक दाखवून जबरदस्ती करून,अवैद्य मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालू ठेवून संघटित गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला आहे. त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुनही त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) प्रमाणे मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव श्री.जयराम पायगुडे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पर्वती पोलीस स्टेशन पुणे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,पुणे,श्री.सुहेल शर्मा यांचे मार्फतीने मा.अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणी छाननी करून पर्वती पोलीस स्टेशन गु.रं.नं.२६४/२०२३,भा.दं.वि.क.३०७,३२६, १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४(२५),म.पो.अधि.कलम ३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ या गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविण कुमार पाटील यांनी मान्यता दिलेली आहे.

पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,सिंहगड रोड विभाग,पुणे,श्री.आप्पासाहेब शेवाळे हे करीत आहेत.

सदर कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-०३,श्री.सुहेल शर्मा, मा.सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड रोड,पुणे,श्री.आप्पासाहेब शेवाळे यांचे मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.विजय खोमणे, पोलीस उप-निरीक्षक,चंद्रकांत कामठे,पोलीस अंमलदार, दिपक लोधा, महेश चौगुले, गोरख मादगुडे,राजू जाधव,कुंदन शिंदे,जगदीश खेडकर यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणांवर बारकाईने लक्ष देवून शरिराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे व नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ७१ वी कारवाई आहे.**